**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील संचालक (माहिती), गट-अ (वरिष्ठ) या पदावर पदोन्नती देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन आदेश क्रमांक : मावज-२०२५ /३०६ / प्र.क्र.९४ /३४-अ,**
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक: ७ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना:-**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील श्री. गोविंद शरदराव अहंकारी, उपसंचालक (प्रशासन), गट-अ (वरिष्ठ) (वेतनश्रेणी एस-२३ : ६७७००-२०८७००) हे शासन निर्णय क्र. मावज-२०१९/५८/प्र.क्र.१२/३४-अ, दिनांक २८.५.२०१९ अन्वये उपसंचालक (प्रशासन) या पदावर पदोन्नतीने कार्यरत आहेत. श्री. राहुल आत्माराम तिडके, संचालक(माहिती) गट-अ (वरिष्ठ) यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.३०.११.२०२४ (म.नं) रोजी संपुष्टात आल्यामुळे रिक्त झालेले पदोन्नतीच्या कोटयातील एका पदावर निव्वळ तात्पुरती पदोन्नती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत आस्थापना मंडळाच्या दि.२३.०३.२०२६ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये मंडळाने संचालक या पदावर तात्पुरत्या स्वरुपात श्री. गोविंद शरदराव अहंकारी यांना पदोन्नती देण्याची शिफारस केली आहे.

**शासन आदेश :-**

आस्थापना मंडळाने केलेली शिफारस विचारात घेऊन श्री. गोविंद शरदराव अहंकारी, उपसंचालक (प्रशासन), गट-अ, यांच्या संचालक पदावरील पदोन्नती बाबत खालीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहे.

अ) श्री. गोविंद शरदराव अहंकारी, ( खुला ) (ज्ये.क्र. ३) यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित / प्रस्तावित नसल्यामुळे, त्यांना संचालक, गट-अ ( वरिष्ठ ) या पदावर पदोन्नतीच्या कोट्यात सन २०२५-२६ च्या निवडसूचीवर, खुल्या प्रवर्गातील एका रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

ब) उपरोक्त पदोन्नती ही खालील नमूद अटीच्या व शासन आदेशासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट “अ” मध्ये लागू असलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील निर्णयास अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सदर पदोन्नती देण्यात येत आहे.

२. श्री. गोविंद श. अहंकारी यांची पदस्थापना संचालक ( माहिती )(वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय(मुख्यालय), मुंबई या पदावर करण्यात येत आहे.

३. श्री.गोविंद श. अहंकारी यांच्या उपरोक्त पदोन्नतीमुळे रिक्त होणाऱ्या उपसंचालक (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय(मुख्यालय), मुंबई या पदाचा अतिरिक्त कार्यभार

योग्य त्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्याची कार्यवाही महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी करावी.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०४०७१२३७२१७४०७ असा आहे हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR

Digitally signed by YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F7CCDB18D954BB814D3CC3C92AB0C128E19F5F95C724ABAF0A38FA1A74DEC734, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A45294B68B97E03C570AFA8F17C64F6DFE2A4A241DD2AFF2322FEEC22B389F5, cn=YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
Date: 2026.04.07 12:39:43 +05'30'

**( युवराज सोरेगांवकर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबत:- परिशिष्ट अ**

**प्रति,**

१. प्रधान सचिव (मावज ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
३. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई / नागपूर,
४. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ ( लेखा परीक्षा ) मुंबई / नागपूर,
५. संचालक ( माहिती ) ( प्रशासन ), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२,
६. संचालक ( माहिती) ( वृत्त व जनसंपर्क ) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२,
७. संचालक ( माहिती) विभागीय माहिती कार्यालय, मराठवाडा विभाग, छत्रपती संभाजीनगर,
८. संचालक ( माहिती ) विभागीय माहिती कार्यालय, नागपूर-अमरावती विभाग, नागपूर,
९. जिल्हा लेखा अधिकारी, नागपूर,
१०. उपसंचालक ( लेखा ) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२,
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड / नागपूर,
१३. उप जिल्हा कोषागार अधिकारी, नवी मुंबई,
१४. सर्व विभागीय माहिती कार्यालय ( मावज ) मार्फत,
१५. सर्व जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ( मावज ) मार्फत,
१६. संबंधित अधिकारी, ( मावज ) मार्फत,
१७. सामान्य प्रशासन विभाग कार्यासन मावज-१ (३४) /१२ /१३ व १६-ब,
१८. निवडनस्ती.

# परिशिष्ट अ

आस्थापना मंडळाने केलेल्या शिफारशी खालील लागू असलेल्या अटींच्या अधीन असतीलः-

१) ज्या अधिकाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित असल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे त्यांच्या बाबतीत केलेल्या शिफारशी मोहोरबंद पाकिटात ठेवण्यात आल्या आहेत. त्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. १५.१२.२०१७ व दि.३०.०८.२०१८ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

२) पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या ज्या अधिका-यांविरुद्ध विभागीय चौकशी प्रलंबित नाही किंवा प्रस्तावित आहे, असे विभागाने स्पष्ट केले आहे. त्यांना प्रत्यक्ष पदोन्नती देण्यापूर्वी विभागाने पुन्हा तपासणी करावी आणि दरम्यानच्या काळात विभागीय चौकशी चालू करण्यात आली असल्यास किंवा त्यांना निलंबित करण्यात आल्यास किंवा त्यांच्याविरुध्द फौजदारी आरोपाचे न्यायालयीन प्रकरण सुरु झाल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. १५.१२.२०१७ व दि. ३०.०८.२०१८ मधील तरतूदीनुसार त्यांना पदोन्नती देण्याबाबत करण्यात आलेल्या शिफारशी मोहोरबंद पाकिटात ठेवून सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

३) पदोन्नतीचे पद महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील असल्यास सदर पदोन्नती/निवडसूची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने नियमित केल्यानंतर पदोन्नतीच्या पदावर सेवाज्येष्ठता व अन्य सेवाविषयक लाभ मिळण्यास पदोन्नत अधिकारी पात्र ठरतील.

४) पदोन्नतीसाठी शिफारस केलेल्या मागासवर्गीय अधिकाऱ्यांच्या जात वैधतेबाबत आवश्यकता असल्यास संबंधित विभाग/कार्यालय (सामाजिक न्याय किंवा आदिवासी विकास विभाग/संबंधित जात पडताळणी कार्यालय) यांच्याकडून खातरजमा करण्यात यावी व तदनंतरच पदोन्नतीचे आदेश निर्गमित करावेत.

५) तदर्थ पदोन्नतीसाठी पात्र ठरलेल्या उक्त अधिका-यांना पदोन्नतीने पदस्थापना देतांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

६) विभागाने आस्थापना मंडळास सादर केलेल्या ज्येष्ठतासूचीनुसार विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांची पात्र / अपात्रता तपासण्यात आली असून ज्येष्ठतासूचीबाबत कोणतेही प्रकरण भविष्यात उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

७) आस्थापना मंडळाच्या शिफारशींनुसार अधिक्रमित होणाऱ्या मागासवर्ग अधिकाऱ्याच्या अधिक्रमणाला मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांची मान्यता घेण्याची व अधिक्रमित होणाऱ्या अनुसूचीत जमातीच्या अधिकाऱ्याच्या अधिक्रमणाला मा. मंत्री (आदिवासी विकास) यांची मान्यता घेण्याची कार्यवाही विभागाने करावी.

८) आस्थापना मंडळाच्या सर्व शिफारशींना शासनाची मान्यता घेण्याची उचित कार्यवाही विभागाने करावी.

९) विभागास सर्वसाधारण सूचना: -

१) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सेवाप्रवेश नियम अद्ययावत करण्यात यावेत.
२) प्रत्येक निवडसूची वर्षात सर्व संवर्गाची रिक्त पदे भरण्याची दक्षता घेण्यात यावी.
३) सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार गोपनीय अहवाल (आवश्यक त्या प्रमाणपत्रासह), सर्व अनिवार्य परिक्षा उत्तीर्ण/सूट, परिविक्षा कालावधी पूर्ण करणे, स्थायित्व प्रमाणपत्र, ५०/५५ व्या वर्षी करावयाचे पुनर्विलोकन इ. बाबींची पूर्तता करण्यात यावी.

***************************